इलेक्ट्रीक साधने ई –ग्रंथ

डॉ. एकनाथ व्हि. चंदनखेडे
ग्रंथपाल
जगत कला, वाणिज्य व इदिराबेन
हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय
गोरेगाव

सार: ई–ग्रंथ इलेक्ट्रॉनिक स्वरुपात एक पुस्तक आहे. हे संगणकामध्ये पी. सी. लॅपटॉप किंवा कोणत्याही अन्य प्रकारच्या कॉम्पुटर वर डाऊनलोड केले जाते. आणि स्क्रीनवर पाहिले जाते. त्यात छापील पुस्तकाप्रमाणे क्रमांकित पृश्ठे, साम्रगीची सारणी, चित्रे, आकृत्या, ग्राफिक्स असू शकतात. हे इंटरनेद्वारे ई–ग्रंथ खरेदी करणे आणि डाऊनलोड करणे अतिशय सोपे आहे. माहिती विस्फोटाच्या युगात माहितीचा प्रसार आणि प्रचार हा वेगाने होत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रचंड प्रभाव आपल्याला दिसून येत आहे. प्रिंट काढून ते इलेक्ट्रॉनिक प्रवास या अनुशंगाने मैलाचा दगड ठरतो आहे.

प्रस्तावना:

माहिती ही कधीच परिपुर्ण ठरत नाही. यांत्रिक प्रलेखाच्या स्वरुपात माहिती साठविलेली असते. मुलभुत प्रलेखामध्ये माहितीचे स्वरुप कधिही बदलत नाही. गतिशिल प्रलेखामध्ये माहितीच्या स्वरुपात माहीती देतांना बदल करता येतो. यांत्रिकी करणामुळे प्रलेखाचे वाटप करणे पुर्वीपेक्षा सोयीचे झाले आहे. त्यामुळे मानवी शक्तीचा अपव्यय टळतो. उपयोजकाला प्रतेक्ष दुसऱ्या ग्रंथालयातील प्रलेखाचा शोध घेता येतो. प्रलेखाची प्रतिरुपेही मिळु शकतात.त्यामुळे उपयोजकांचा वेळ पण वाचतो.

इलेक्टीक साधने विविध कारणासाठी वापरली जातात. जसे की, क्रीयाकलाप, संदर्भ साहित्य, पुरवणी माहिती ,कार्यपत्रके आणि इतर असाइमेन्ट विद्यार्थ्याना ते कागज पत्र ई मेल दारे ,व्यपस्थापन प्रणाली शिकण्यापासून किंवा फाइल शेअरिंगसिस्टम दारे डाउनलोड करून मिळतात. इलेक्टानिक साधने जसे वर्ड डाकूमेन्ट पीडीफ, डाकूमेन्ट स्पेडशीट, डाकुमेन्ट,पावर पॉइट डाकूमेन्ट इत्यादी

ई ग्रंथ:

इलेक्टानिक पुस्तके किंवा ई पुस्तक प्रकाशन आहे जे डिजिटल स्वरूपात उपलब्द असते. वा आहे. ज्यात मजकुर,प्रतिमा किंवा दोधांचाहि समावेश असतो. संगणकाचा फ्लॅट पॅनेल प्रदर्शनावर वाचण्यायोग्य किवा अन्य डिव्हाइसेवर उपलब्ध आहे. किंवा असते. जरी काही वेळा छापील पुस्तकांची इलेक्ट्राणिक आवृती म्हणुन परिभाशित केले असले तरी काही इ पुस्तके मुद्रित समतुल्यतेशिवाय अस्तित्वात आहेत. व्यापारी रित्या उत्पादित आणि विक्री केलेली ई पुस्तके हे विशेशता समर्पित इ वाचक उपकरणावर वाचले

जाउ इच्छितात. तथापि जवळ जवळ कोणत्याही अत्याधुनिक संगनक डिव्हाइसमध्ये नियंत्रनायोग्य पाहण्याच्या स्क्रीनची वैशिश्टये आहेत. टॅब्लेटस आणि स्मार्टफोनसह इ पुस्तके वाचण्यासाठी वापरले जाउ शकते दृइ.स. २००० च्या शतकात इंटरनेट वर मुद्रण आणि ईबुक विक्रीची एक प्रवुती होती. जेथे वाचक इ कॉमर्स सिस्टीम वापरून वेबसाइटवर पारंपारिक पेपर बुक आणि इ बुक विकत घेतात. अमेरिकेतील२०१२ च्या प्रारंभाच्यावेळी हार्डकव्हर मध्ये वितरित करण्यापेक्षा अधिक इ ग्रंथ ऑनलाइन प्रकाशित करण्यात आली होती.

इंटरनेटची लोकप्रियता व माहिती तंत्रज्ञानाची सर्व व्यापकता त्यामुळे प्रकाशन व्यवसायातील लोकांना वेब प्रकाशन आणि इलेट्रानिक प्रकाशन या विशयी विचार करणे आवश्यक झाले. इलेट्रानिक बुक ज्याला संक्षिप्त स्वरूपात इ बुक असेही म्हटले जाते हे एक महत्वाचे डिजिटल रिसोर्स आहे. याचा वापर करणे पारंपारिक अशा मुद्रित साधनाबरोबरच इलेट्रानिक मिडियाकडे वळणे होय. परंतु याचाच अर्थ ई बुक म्हणजे पारंपारीक ग्रंथांना पुर्ण तिरांजली देणे असा नाही आहे. इ बुक हे पारंपारिक ग्रंथाचे अमुदित रूपच होय. संगणकाच्या किंवा इ बुकच्या रिडरच्या माध्यमातून या नविन स्वरुपाच्या ग्रंथाचे वाचन किंवा आकलन करता येईल.

ॲलन केंट म्हणतो इलेक्ट्रॉनिक बुक म्हणजे असा गृप कि जो मुद्रित ग्रंथासारखा नेहमी प्रमानेच असतो. पण त्याचे प्रकटीकरण संगणकाच्या पडद्यावर अनुमुद्रित स्वरुपात होते. हे ग्रंथ तयार करण्यासाठी कागदाची आवश्यकता नसते. हे ग्रंथ संगणकावर टंकलिखित केलेले असतात.पण ते वाचण्यास संगणकाचा वापर आवश्यक आहे.

ई–ग्रंथामध्ये अनेक ग्रंथांची माहिती अंतर्भुत असते. या मध्ये पाठयपुस्तके, इलेक्ट्रॉनिक गृप चा समावेश होतो. यांत्रिक तंत्रज्ञानामुळे या प्रकाशन व्यवसायात मोठी क्रांती झाली आहे. अशा एकाच क्लिकवर बरेच ग्रंथ समाविश्ट करता येतात. अशा प्रकारच्या ग्रंथालयामुळे ग्रंथालयात अशा साहित्याला जागा कमी लागते. या प्रकारच्या ग्रंथाबर हवामान वैगेरेचा परिणाम होत नाही. ग्रंथाची प्रत कमी वेळात उपलब्ध होते. आज आपण वाचतो की बऱ्याचशा विशयांचे ग्रंथ ई–बुकच्या स्वरुपात येत आहेत. इतर काही मुद्रित ग्रंथासोबत सीडीच्या स्वरुपात ग्रंथालयात येत आहेत. आज आपण पाहतो कि इनसायक्लोपीडीया ब्रिटानिका ३२ व्हालूम किंवा मराठी विश्वकोशाचे एवढे ग्रंथ ग्रंथालयात न ठेवता ते ई बुकच्या स्वरुपात साठविण्याकडे ग्रंथालयाचा कल दिसतो आहे. कारण कि त्यांना जागा कमी लागतो. व कमी पैशानेही साधने खरेदी करता येते. पण मित्रहो हे ई–बुक संगणकाच्या मदती शिवाय वाचताच येत नाही. एका वेळी एकच वाचक ते हाजाळू शकतो. या ग्रंथात अनेक प्रकारची माहिती, आवाज, चित्रे, रंग यासह समाविश्ट असते. हे ग्रंथ चोरिची शक्यता नसते. व ते हरविले जात नाही.

ई–बुक खरेदी करण्याचे प्रमुख कारण सांगतांना त्यांचे कमी दर म्हणता येईल.

ई ग्रंथांची वैशिश्टये:

- आपण ई ग्रंथांचे पृश्ठ मुद्रित करु शकतो.

- आपण ई ग्रंथ पाहतांना सहसा झुम इन आणि आऊट करु शकतो.
- आपण कधी कधी ऑनलाईन पाहण्यासाठी आपल्या संगणकावर ई–ग्रंथ जतन करु शकतो.
- आपण अनेकदा ई–ग्रंथ मधील पुश्ठे मार्क करु शकतो.
- ई–ग्रंथ वर मजकूर शोधू शकतो.
- ई–ग्रंथवर मुद्रित पाठय पुस्मकांचा पुर्ण मजकूर सर्व आकृत्या स्पश्टीकरण दिलेले असते.

ई–ग्रंथ इलेक्ट्रॉनिक स्वरुपात एक पुस्तक आहे. हे संगणकामध्ये पी. सी. लॅपटॉप किंवा कोणत्याही अन्य प्रकारच्या कॉम्पुटर वर डाऊनलोड केले जाते. आणि स्क्रीनवर पाहिले जाते. त्यात छापील पुस्तकाप्रमाणे क्रमांकित पृश्ठे, साम्रगीची सारणी, चित्रे, आकृत्या, ग्राफिक्स असू शकतात. हे इंटरनेद्वारे ई–ग्रंथ खरेदी करणे आणि डाऊनलोड करणे अतिशय सोपे आहे. गुगल वर त्यांची लिंक पहायला मिळते.

ई– ग्रंथाचे फायदेः

- **शोधने सोपेः** आपल्या संगणकावर ई–बुक शोधने सोपे आहे.
- **पर्यावरण :** ई–ग्रंथ पर्यावरणासाठी चांगली आहे. आपण झाडांना तोडत नाही. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होण्यास मदत होते.
- **शिपिंग खर्च नाहीः** इलेक्ट्रॉनिक फाइल्स हातात असल्यामुळे आपण फक्त ती वेबवरुन डाऊनलोड करु शकत
- असल्यामुळे शिपिंग खर्च नाही.
- **कमी मुल्य :** ई–ग्रंथाचे मुल्य कमी असते. छापील पुस्तकांच्या बाबतीत प्रकाशकांना कदाचित १००० क्यूपीजचे किमान
- उत्पादन करणे आवश्यक आहे. यात वेळ आणि पैसा लागतो.
- ई ग्रंथ हे हजारो मिल दूर राहणाऱ्या मित्रांना सहज पाठविता. येते. ई मेल करता येतो.

ई–ग्रंथाचे तोटेः

जसे फायदे असतात. तसे तोटे असतात. ते पुढिलप्रमाणे

- **वाचण्यासाठी सोयिस्कर नाहीः** ई–बुक, वाचन करण्यासाठी वाचकास तासनतास संगणक किंवा पडद्यासमोर बसून रहावे लागते
- **मुद्रण खर्चः** ई–बुक, पी. डी. एफच्या स्वरुपात उपलब्ध असल्यामुळे ते प्रिंट ण काढून वाचू शकतील.
- वाचण करण्यास इलेक्ट्रीकची आवश्यकता तसेच संगणकाची आवश्यकता असते.
- ई बुक केवळ ऑनलाईन वाचता येतात. ती एच. टि. एम. एल. च्या स्वरुपात पुस्तके लहान पेजवर आहेत.

- ५) एकावेळी एकच वाचक हाताळू शकतो.
- ६) ई–बुक संगणकाच्या मदतीशिवाय वाचता येत नाही.

माहिती विस्फोटाच्या युगात माहितीचा प्रसार आणि प्रचार हा वेगाने होत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रचंड प्रभाव आपल्याला दिसून येत आहे. प्रिंट काढून ते इलेक्ट्रॉनिक प्रवास या अनुशंगाने मैलाचा दगड ठरतो आहे.

ग्रंथालयाचे पुर्वीचे स्वरुप हे फक्त ग्रंथ व नियतकालिके इत्यादि वाचन साहित्य उपलब्ध करुन देणारे होते. मात्र आज ज्ञान विविध साधनांद्वारे व माध्यमांद्वारे ग्रंथालयात संग्रहित केले जाते. म्हणूनच ग्रंथालयाला महाविद्यालयाच्या हृदयाची उपमा दिलेली आहे.

समारोप :

विसाव्या शतकाच्या अखेरिस प्रकाशन व्यवसायात एक मुलभूत बदल झाला आहे. ग्रंथालय आणि माहिती केंद्राच्या कार्यात स्वरुपात तंत्रज्ञानातील क्रांती आणि माहितीचा विस्फोट यांनी लक्षणिय बदल घडवून आणला. कागदावर छापली जाणारी ग्रंथ, नियतकालिके आता फ्लॉपी, डिस्क, चुंबकिय किती, घन तबकडया वैगेरे साहित्यावर छापून येत आहेत. सध्या ग्रंथालयाकडे असणाऱ्या आर्थिक उपलब्धतेतून होणारी कपात, टपाल ठरावातील वाढ यामुळे ग्रंथालयांना ई प्रकाशने स्विकारल्याशिवाय पर्याय नाही. इ. स. १९८५ मध्ये जर्मनीत पहिला ई ग्रंथ प्रकाशित झाला.

संदर्भ:

- कोलते एस. एम. २००७) माहिती तंत्रज्ञान आणि व्यावसायिक माहिती कार्यपध्दती नागपूर पिंपळापूरे अॅड कंपनी पब्लिशर्स
- लेले वसंत वि. २०१२) ग्रंथालय आणि माहिती शास्त्र्ातील विविध पैलू पुणे युनिव्हर्सल प्रकाशन
- Role of Library in Information Education (http;// egyankosh.ac.in)